जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

04 FEB 2023

महासत्ता।

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांची महापारेषणला भेट

मुंबई, ता. ३ -

.........................

येथील महापारेषणच्या सांघिक कार्यालयाला शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यास दौऱ्यानिमित्त भेट दिली. महापारेषण कंपनीचे कामकाज, कार्यपध्दती व जनसंपर्क विभागास भेट देऊन विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली.



वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी सुरूवातीला जनसंपर्क विभागाला भेट दिली. प्रारंभी महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी सर्वांचे स्वागत केले. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली महापारेषणने विविध उपक्रम कसे प्रभावीपणे राबविले आहेत, याची माहिती दिली. महापारेषण कंपनीने आधुनिक तंत्रज्ञान वापरून वीजवहन व वीजपुरवठा सुरळीत ठेवला आहे. त्यामुळे महापारेषण कंपनीला विविध पुरस्कार मिळाले आहेत. महापारेषणने कोरोना काळात व तौक्ते, निसर्ग चक्रीवादळात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कसे सांघिक भावनेने काम केले, याबद्दल ध्वनिचित्रफित विद्यार्थ्यांना दाखविली. 'तसेच जनसंपर्क विभागाचे ऋमहापारेषण समाचार मासिक, दैनंदिनी व दिनदर्शिकिविषयी माहिती दिली.

महापारेषणचे संचालक सुगत गमरे यांनी महापारेषणची संपूर्ण यंत्रणा, मनुष्यबळ, कामकाज व कार्यपध्दतीची माहिती दिली. याप्रसंगी महापारेषणचे महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) राजू गायकवाड, संचालक (मा.सं.) यांचे विशेष कार्य अधिकारी तथा व्यवस्थापक महेश आंबेकर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या डॉ. सुमेधा साळुंखे, दीपक कुन्नुरे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी शेवटी आभार मानले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा १६ रोजी दीक्षांत समारंभ

- राज्यपाल कोश्यारी, विनय सहस्रबुद्धे, ना. चंद्रकांत पाटील प्रमुख पाहुणे
- व्यवस्थापन परिषद बैठकीत निर्णय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ १६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. दीक्षांत समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद, नवी दिल्लीचे अध्यक्ष विनय सहस्रबुद्धे, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांना बोलावण्याचा निर्णय विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत झाला.

हा दीक्षांत समारंभ पूर्वीप्रमाणे केंद्रीय पद्धतीने होणार आहे.

व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. सचिव म्हणून कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. यात ॲकॅडमीकच्या संदर्भात अन्य काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. दीक्षांत समारंभात किती विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र द्यायचे यावर शिक्कामोर्तब करण्यात आले.



पुढारी

# विद्यापीठातर्फे एच. आर. मॅनेजरसाठी १८ रोजी एमडीपीचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या वतीने शनिवार (दि.१८) रोजी हॉटेल सयाजी येथे दुपारी ३ वाजता एच. आर. मॅनेजर यांच्यासाठी 'मॅनेजमेंट डेव्हलपमेंट प्रोग्रॅम (एमडीपी) आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे वकील जमशेद कामा यांच्या हस्ते होणार आहे. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित असणार आहेत. 'चेंजिंग लँडस्केप ऑफ लेबर लॉ फ्रेमवर्क अँड इट्स इम्पॅक्ट ऑन इंडस्ट्रीज' ही मध्यवर्ती संकल्पना घेऊन कार्यक्रम होत आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या उद्यापासून नियोजित वेळापत्रकानुसार परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा ६ फेब्रुवारीपासून पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार घेण्याचे निर्देश परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी अधिविभाग प्रमुख व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना दिले आहेत. तसे परिपत्रक शनिवारी विद्यापीठ परीक्षा विभागाने प्रसिद्ध केले.

महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समितीने २ फेब्रुवारीपासून बेमुदत आंदोलनाचा निर्णय घेऊन सर्व परीक्षांच्या कामकाजावर बहिष्कार घातला आहे. पान ४ वर ▸



## परीक्षेची सर्व तयारी

६ फेब्रुवारीपासून पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार सुरू होणाऱ्या परीक्षांच्या कामामध्ये सहकार्य करावे, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे. परीक्षेसाठी आवश्यक असणारी सर्व तयारी विद्यापीठाने केली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालकांनी दिली.

# शिवाजी विद्यापीठाच्या उद्यापासून नियोजित वेळापत्रकानुसार परीक्षा

(पान १ वरून) शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयात हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा विविध केंद्रावर सुरू आहेत. विद्यापीठाने २, ३ व ४ फेब्रुवारीच्या रोजीच्या परीक्षा स्थगित केल्या होत्या.

आता ६ फेब्रुवारीपासून पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार परीक्षा घेण्यात येणार आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमातील तरतुदीनुसार परीक्षा वेळेत पार पाडण्याची जबाबदारी अधिविभाग प्रमुख, संचालक, प्राचार्य, संचालक यांची आहे. त्यादृष्टीने परीक्षा केंद्रप्रमुख तथा प्राचार्यांनी आवश्यक ती उपाययोजना करावी. परीक्षा वेळेत होतील दक्षता घ्यावी. त्यासाठी पर्यायी उपाययोजना आखावी, असे परिपत्रकात म्हटले आहे.

पुण्यनगरी

# विद्यापीठ परीक्षा सोमवारपासून

## परीक्षा विभागाचा निर्णय, जबाबदारी केंद्रप्रमुखांवर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्रलंबित मागण्यांकडे राज्य सरकारकडून होत असलेल्या दुर्लक्षाच्या निषेधार्थ विद्यापीठ व महाविद्यालय सेवक संयुक्त कृती समितीने गुरुवार, दि. २ पासून परीक्षांच्या कामकाजावर बहिष्कार आंदोलन पुकारले आहे. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने २ - ४ फेब्रुवारीदरम्यानच्या परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय घेतला होता. आंदोलन सुरू असतानाही सोमवार, दि. ६ पासून पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार परीक्षा घेण्यात येणार असून, परीक्षा घेण्याची जबाबदारी संबंधित परीक्षा केंद्रप्रमुखांची असल्याचे जाहीर केले आहे.

विद्यापीठ व महाविद्यालय सेवक संयुक्त कृती समितीतर्फे राज्यभर आंदोलन सुरू आहे. या आंदोलनामध्ये शिवाजी विद्यापीठातील कर्मचारीही सहभागी झाले आहेत. कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनामुळे हिवाळी सत्रातील दि. २ ते ४ फेब्रुवारीदरम्यानच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या. दरम्यान, परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार होणार आहेत. तसेच दि. २ ते ४ रोजीच्या परीक्षांचे वेळापत्र स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे जाहीर केले आहे.


सकाळ

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ १६ रोजी

## राज्यपाल कोश्यारी, विनय सहस्त्रबुद्धे यांची उपस्थिती



भगतसिंह कोश्यारी



विनय सहस्त्रबुद्धे

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ गुरुवारी, १६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या समारंभाला राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. आज झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक आज झाली. यामध्ये व्यवस्थापन परिषदेवरील नूतन सदस्य उपस्थित होते. बैठकीत दीक्षान्त समारंभ गुरुवारी (ता. १६) घेण्याचे निश्चित करण्यात आले. तसेच या समारंभात किती विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र द्यायचे, याचाही निर्णय झाला. राज्यपाल कोश्यारी यांच्यासह डॉ. सहस्त्रबुद्धे यांची प्रमुख उपस्थिती या सोहळ्याला असणार आहे. डॉ. विनय सहस्त्रबुद्धे हे राज्यसभेचे माजी खासदार असून इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन या संस्थेचे अध्यक्ष आहेत. ते ज्येष्ठ राजकीय विचारवंत असून भारताची सौम्य संपदा (सॉफ्ट पॉवर) याबद्दलची मांडणी त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर केली आहे. व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत झाली. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

सकाळ

# विद्यापीठाच्या मराठी विभागात माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

कोल्हापूर : 'शिक्षक हे परिपूर्ण माणूस घडविण्याचे कार्य करतात', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठात मराठी विभागातील माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात बोलत होते. १९९६-९७, ९७-९८ या वर्षांतील माजी विद्यार्थी यावेळी एकत्र आले होते. डॉ. शिंदे म्हणाले, 'शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागात भाषा, साहित्य आणि समाज या संदर्भातील परंपरा वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराष्ट्राच्या वाङ्मयीन संस्कृतीत मराठी विभागाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.' यावेळी प्राचार्य अशोक बाबर, प्रा. डॉ. गिरीश मोरे प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. रणधीर शिंदे, लेखक अनुवादक सोनाली नवांगुळ, डॉ. हिमांशू स्मार्त, चंद्रशेखर गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी विद्यार्थ्यांमार्फत डॉ. हिमांशू स्मार्त यांना एशियाटिक सोसायटीची अरुण टिकेकर फेलोशिप मिळाल्याबद्दल, तसेच सोनाली नवांगुळ यांना महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार मिळाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. दिलीप जाधव यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. प्रकाश हुलेनवर यांनी करून दिला. सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले. प्रा. बाळासाहेब माने यांनी आभार मानले.

सकाळ

# निरंतर शिक्षणातून विकास : डॉ. महाजन

कोल्हापूर : निरंतर शिक्षण अभ्यासक्रम औपचारिक व अनौपचारिक शिक्षणातील दुरावा कमी करण्यास मदत करतो. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार आजीवन अध्ययन विस्तार विभागात औपचारिक शिक्षणाचे अभ्यासक्रम राबवता येतात. हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पूरक आहेत. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. एस. एस. महाजन यांनी केले. विभागप्रमुख डॉ. रामचंद्र पवार यांनी शैक्षणिक वाटचालीची माहिती दिली. स्वागत व पाहुण्यांची ओळख सहा.प्राध्यापिका डॉ. सुमन बुवा यांनी करून दिली. टी. आर. गुरव, वसंत सिंघन, रवींद्र खैरे, अभिजीत जाधव, गीता कुलकर्णी, विणा मालडीकर, प्रीती चव्हाण यांची भाषणे झाली. आभार व सूत्रसंचालन श्वेता आठवले यांनी केले. इव्हेंट मॅनेजमेंट, योग, मोडी लिपीचे विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

05 FEB 2023
सकाळ

## स्थगित केलेल्या विषयांच्या परीक्षेचे वेळापत्रक लवकरच करणार जाहीर

# विद्यापीठाच्या परीक्षा उद्यापासून पूर्ववत

**▶ सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : राज्यातील अकृषक विद्यापीठे आणि महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संपामुळे शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या. मात्र हिवाळी सत्रातील सर्व विषयांची परीक्षा सोमवार (ता. ६) पासून नियोजित वेळापत्रकानुसार सुरू करण्याचा निर्णय परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतला आहे.

गुरुवार (ता. २), शुक्रवार (ता. ३) आणि शनिवार (ता. ४) या दिवशी स्थगित केलेल्या विषयांच्या परीक्षेची तारीख लवकरच कळवण्यात येईल, अशी माहिती परीक्षा व



मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी आज प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. दरम्यान, कर्मचाऱ्यांचा संप कायम असून त्यांनी परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार घातला आहे.

राज्यातील सर्वच विद्यापीठे आणि महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार घालून संप पुकारला. त्यामुळे २ ते ४ फेब्रुवारीला होणारी परीक्षा स्थगित करण्यात आली. मंत्रालयात कर्मचारी संघटना आणि शासन यांच्यामध्ये वारंवार चर्चा झाली, मात्र यातून काही निष्पन्न झाले नाही. दरम्यान, आज विभागीय संचालक, कुलगुरू आणि कर्मचारी संघटना यांची बैठक शिवाजी विद्यापीठात झाली.

यामध्ये जोपर्यंत आमच्या मागण्यांच्या संदर्भात शासन लेखी आश्वासन देत नाही तोपर्यंत आम्ही संप मागे घेणार नाही, अशी भूमिका संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली. त्यामुळे या बैठकीत परीक्षेबाबत कोणताही तोडगा निघाला नाही. विद्यार्थ्यांच्या परीक्षा पर्यायी व्यवस्था घेऊन निश्चित कालावधीत पूर्ण कराव्यात, अशी सूचना राज्य शासनाने विद्यापीठ प्रशासनाला केली होती. त्यामुळे परीक्षांबाबत ठोस निर्णय घेणे परीक्षा मंडळाला क्रमप्राप्त होते. अखेर विद्यापीठाच्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाने परीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केला. सोमवार (ता.६) पासून सर्व विषयांच्या परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणे होणार आहेत. तसेच जे पेपर संपामुळे स्थगित केले होते, त्यांच्या परीक्षेचे वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाईल, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाने कळवले आहे.

## कर्मचारी संघटनांचा संप कायम

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू, विभागीय सहसंचालक कार्यालयाचे शासन प्रतिनिधी, प्रभारी कुलसचिव, विद्यापीठातील इतर अधिकारी आणि संयुक्त कृती समितीची आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आज बैठक झाली. या बैठकीमध्ये कुलगुरू, विभागीय सहसंचालक डॉ. आर. डी. मारडकर यांनी परीक्षेवरील बहिष्कार मागे घ्यावा, अशी विनंती संघटनेला केली.परंतु, हे आंदोलन राज्यभर आहे.


संपाचा निर्णय हा राज्य कृती समितीचा असल्याने संप मागे घेण्याचा निर्णय स्थानिक पातळीवर होऊ शकत नाही. शासनाने कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नाही. उलटपक्षी शासनाने आंदोलन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे पत्र पाठवून आंदोलन चिघळवण्याचा प्रयत्न केला. शासनाकडून कालमर्यादा घालून ठोस लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय आंदोलन कोणत्याही परिस्थितीमध्ये मागे घेता येणार नाही, असे कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. या बैठकीस मुख्य संघटक मिलिंद भोसले, आनंदराव खामकर, संजय पवार, सचिन नाळे, दिनेश उथळे, प्रकाश श्रावस्ती, सरदार सोनंदकर आदी उपस्थित होते.

05 FEB 2023

श्री रणझुंझार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्येष्ठ कवी ना.वा. देशपांडे यांची साहित्यसंपदा वाचकांसाठी उपलब्ध



१) कवी ना.वा. देशपांडे यांची साहित्यसंपदा लोकार्पण प्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, प्रा. शशिकांत चौधरी, सुनंदा देशपांडे, वसुधा लाटकर आदी २) कवी ना.वा. देशपांडे यांच्या साहित्यसंपदेसह ३) सुनंदा देशपांडे सुनंदा देशपांडे यांचा कृतज्ञतापूर्ण गौरव करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के.

कोल्हापूर : ज्येष्ठ साहित्यिक व कवी ग.दि. माडगूळकर यांनीच ज्यांना आपले मानसपुत्र मानले, असे येथील प्राचीन वाङ्मयाचे ज्येष्ठ अभ्यासक व कवी ना.वा. देशपांडे यांच्या १०व्या जयंतीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाकडील त्यांची साहित्यसंपदा आजपासून वाचकांसाठी उपलब्ध करण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि सुनंदा देशपांडे यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. कवीवर्य देशपांडे यांच्या इच्छेनुसार त्यांच्या पत्नी सुनंदा यांनी त्यांची समग्र साहित्यसंपदा गेल्या वर्षी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राकडे सुपूर्द केली. यामध्ये अनेक दुर्मिळ ग्रंथांचाही समावेश आहे. विद्यापीठाने या संग्रहाच्या नोंदणीचे काम पूर्ण करून आज देशपांडे यांच्या १०व्या जयंतीनिमित्त वाचकांसाठी हा संग्रह उपलब्ध केला. विद्यापीठाच्या अर्काईव्ह कक्षामध्ये स्वतंत्र कपाटामध्ये हे साधारण ४९८ ग्रंथ ठेवण्यात आले आहेत. आज कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील, श्रीमती देशपांडे यांच्या उपस्थितीत हा लोकार्पणाचा छोटेखानी कार्यक्रम झाला. 'हा माझ्या आयुष्यातील सर्वाधिक हृद्य व संस्मरणीय प्रसंग असून पतीला दिलेल्या वचनाची पूर्तता केल्याचे समाधान वाटत आहे,' अशा भावना सुनंदा देशपांडे यांनी व्यक्त केल्या. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प तसेच ग्रंथदेणगी प्रदान प्रसंगीचे छायाचित्र भेट देऊन देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. धनंजय सुतार, प्रा. शशिकांत चौधरी, उपग्रंथपाल डॉ. पी.बी. बिलावर, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. एस.बी. चोरगे, ए.बी. बालेकर, रविंद्र बचाटे, मदन मस्के, वसुधा वासुदेव लाटकर, निवेदिता श्रीपाद देशपांडे, उमा अरविंद भिलवडीकर, अनामिका अनिल पाठक आदी उपस्थित होते.

श्री रणझुंझार

जनसंपर्क कक्ष

0 5 FEB 2023

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांची महापारेषणला भेट

## महापारेषणची कार्यपध्दती व विविध उपक्रमांची घेतली माहिती






मुंबई : येथील महापारेषणच्या सांघिक कार्यालयाला शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यास दौऱ्यानिमित्त भेट दिली.

महापारेषण कंपनीचे कामकाज, कार्यपध्दती व जनसंपर्क विभागास भेट देऊन विविध उपक्रमांची माहिती जाणून घेतली. वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी सुरूवातीला जनसंपर्क विभागाला भेट दिली. प्रारंभी महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी सर्वांचे स्वागत केले. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली महापारेषणने विविध उपक्रम कसे प्रभावीपणे राबविले आहेत, याची माहिती दिली. महापारेषण कंपनीने आधुनिक तंत्रज्ञान वापरून वीजवहन व वीजपुरवठा सुरळीत ठेवला आहे. त्यामुळे महापारेषणला कंपनीला विविध पुरस्कार मिळाले आहेत. महापारेषणने कोरोना काळात व तौक्ते, निसर्ग चक्रीवादळात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कसे सांघिक भावनेने काम केले, याबद्दल ध्वनिचित्रफित विद्यार्थ्यांना दाखविली. तसेच जनसंपर्क विभागाचे ऋमहापारेषण समाचारऋ मासिक, दैनंदिनी व दिनदर्शिकेविषयी माहिती दिली.

महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी महापारेषणची संपूर्ण यंत्रणा, मनुष्यबळ, कामकाज व कार्यपध्दतीची माहिती दिली. पत्रकारितेतील विद्यार्थ्यांनी भविष्यात सामान्य नागरिक केंद्रबिंदू मानून सकारात्मक पत्रकारिता करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी महापारेषणचे महाव्यवस्थापक (मा.सं.मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, संचालक (मा.सं.) यांचे विशेष कार्य अधिकारी तथा व्यवस्थापक श्री. महेश आंबेकर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या डॉ. सुमेधा साळुंखे, श्री. दीपक कुभुरे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी शेवटी आभार मानले.

### विविध उपक्रमांमुळे विद्यार्थी भारावले

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे (भा.प्र.से.) व संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेले सुसज्ज व सर्वसुविधायुक्त वाचनालय व व्यायामशाळा पाहून विद्यार्थी भारावले. महापारेषण भविष्यात ई-लायब्ररी सुरू करणार असल्याचे सांगताच पीएच.डी. करत असणारे विद्यार्थी श्री. दीपक कुभुरे यांनी हा उपक्रम खूपच स्तुत्य असून आपणही महापारेषणला दोन हजार रूपयांची पुस्तके मोफत देणार असल्याचे जाहीर केले.

तरूण भारत

# सोमवारपासून विद्यापीठाच्या परीक्षा पूर्ववत



प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ च्या हिवाळी पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा सोमवार ६ फेब्रुवारीपासून पुर्ववत होणार आहेत. सोमवारपासून पुर्वनियोजित वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा घेवून वेळेत परीक्षा पूर्ण केल्या जाणार आहेत. या परीक्षेच्या कामावर कर्मचाऱ्यांचा बहिष्कार असल्याने प्राध्यापक, इतर कर्मचाऱ्यांच्या मदतीने परीक्षेचे कामकाज पूर्ण करण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला आहे. विद्यापीठ कायदा २०१६ च्या नियमानुसार परीक्षा घेण्याची जबाबदारी परीक्षा केंद्रप्रमुख, अधिविभागप्रमुख, संचालक, प्राचार्य यांची आहे. त्याप्रमाणे केंद्रप्रमुख, प्राचार्य यांनी आवश्यक त्या उपाययोजना करून परीक्षा विहीत वेळेत घ्याव्यात. तसेच विद्यार्थी हित लक्षात घेवून विद्यापीठ व महाविद्यालय कर्मचाऱ्यांनी सोमवार ६ फेब्रुवारीपासून परीक्षेच्या कामकाजात सहभागी होवून, सहकार्य करावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने केले आहे.

## व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत दीक्षांतचे पाहुणे ठरले

शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ १६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या दीक्षांत समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून राज्यपाल भगतसिंग कोशारी आणि विनय सहस्त्रबुध्दे यांना बोलावण्याचा निर्णय विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. तसेच दीक्षांत समारंभात किती विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र द्यायचे यावरही शिक्कामोर्तब करण्यात आले. तसेच ॲकॅडमीकच्या संदर्भात अन्य काही निर्णय घेण्यात आले. व्यवस्थापनची बैठक कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली आहे. तर सचिव म्हणून कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.